**प्रेसनोट** **दिनांक १८/०५/२०१९**

## येरवडा पोलीस स्टेशन, पुणे

## कम्युनिटी पोलीसीग संकल्पने अंतर्गत आय.बी.एम. आय.टी.पार्क, येरवडा येथील सुरक्षा रक्षकांची बैठक घेवून त्यांना सुरक्षे संदर्भात मागदर्शन केले बाबत.

---

पुणे शहर पोलीस आयुक्तालयाअंतर्गत राबविण्यात येत असलेल्या कम्युनिटी पोलिसींग या संकल्पने अंतर्गत, दि. १२/०५/२०१९ रोजी श्री. अजय वाघमारे, पोलीस निरीक्षक (गुन्हे), अतिरिक्त कार्यभार वरिष्ठ पोलीस निरीक्षक, येरवडा पो.स्टे.यांचे मार्गदर्शनाखाली येरवडा पो.स्टे.कडील पो.उप.निरी. श्री. व्ही.जे.माने यांनी जेलरोड पो.चौकीचे हद्दीतील आय.बी.एम. आय.टी.कंपनी, येरवडा, पुणे येथील सुरक्षा रक्षकांची १९:४० वा. ते २०:५५ वा. चे दरम्यान बैठक घेतली. सदर बैठकीमध्ये त्यांना आय.टी.कंपन्यांमधील नोकरदार महिला वर्गासाठी सुरू असलेल्या बडीकॉप ची माहिती देण्यात आली. तसेच त्यांना आय.टी.कंपनी येथील सुरक्षेच्या दृष्टीने घ्यावयाची दक्षता, उपाययोजना याबाबत तसेच तेथे नोकरीस असलेल्या महिला कर्मचाऱ्यांचे सुरक्षा विषयक मार्गदर्शन केले. तसेच त्यांना पुणे शहर पोलीस आयुक्तालयाकडून नागरिकांसाठी राबविण्यात येणारे १४ योजनांची माहिती देण्यात आली.

अशा प्रकारे श्री.अजय वाघमारे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) अतिरिक्त कार्यभार वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली येरवडा पोलीस स्टेशन कडील पो.उप.निरी. श्री. व्ही.जे.माने यांनी कम्युनिटी पोलिसींग संकल्पने अंतर्गत आय.बी.एम. आयटी पार्क, येरवडा येथील सुरक्षा रक्षकांची बैठक घेऊन त्यांना सुरक्षेबद्दल माहिती देऊन उल्लेखनिय कामगिरी केली आहे.



